# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 10/09/2023 (रविवार) सायंकाळ**

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** – दिनांक ०९/०९/२०२३ चे ०७.०० वा. ते १२.३० वा. सुमारास फिर्यादीची मुलगी ही इयत्ता १२ वी मध्ये शिकत असुन घरून सकाळी ०७.०० वा. गार्डन चौक येथुन स्टार बस पकडुन कॉलेजला जाते व दुपारी १२.३० वा. परत येते. दिनांक ०९/०९/२०२३ रोजी सकाळी ०७.०० वा. ती घरून कॉलेजला गेली व १२.३० वा. घरी परत आली नाही. दुपारी ०३.३० वा. दरम्यान फिर्यादीने तिची मुलगी हिला फोन केले असता फोन बंद आला. कॉलेज मध्ये जावुन विचारपुस केली असता असता ती कॉलेजला आली नाही असे समजले. तिचा शोध घेतला परंतु ती मिळुन आली नाही. कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या मुलीला पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोना दिपाली फटींग ब. नं. १२६८ पोस्टे एमआयडीसी बोरी या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर